RNI NO. MAHMAR/2020/84035




# BAHUJAN SAURABHA
# बहुजन सौरभ




रविवार, २९ जून २०२५ | वर्ष : ५ | अंक : १८२ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Sunday, 29 June 2025 | Year : 5 | Issue : 182 | Daily | Rate: Rs. 5/-

## भारतातील पहिल्या संविधान उद्देशिका पार्क व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे लोकार्पण



# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मरणासाठी संविधान उद्देशिका पार्क एक महत्वाचे पाऊल : सरन्यायाधीश भूषण गवई

**नागपूर :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपूर शहरातच आपल्या आयुष्याच्या अंतिम काळात क्रांतीकारक धम्मप्रवर्तन केले. या क्रांतीकारक घटनेचे स्मरण कायम राहण्यासाठी व यातून प्रेरणा घेण्यासाठी दीक्षाभूमी स्मारकाची स्थापना झाली. भौगोलिकदृष्ट्या भारताचा मध्यबिंदू असलेल्या झिरो माईल येथे संविधान चौक निर्माण झाला आणि आता डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कुल ऑफ लॉ परिसरात संविधान उद्देशिका पार्क उभा राहिला आहे. ही वास्तूही येथे भेट देणाऱ्या प्रत्येक नागरिकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्याचे स्मरण व प्रेरणा देईल, असेही ते म्हणाले. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात भारताचे सरन्यायाधीश म्हणून पदभार स्विकारण्याचा व त्यानंतर पहिल्याच नागपूर भेटीत संविधान उद्देशिका पार्कच्या उद्घाटनाचा योग आल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. या पार्कमध्ये लावण्यात आलेली भित्तीचित्रे, डॉ. बाबासाहेबांचे मौलीक वाक्ये आदी बाबी उल्लेखनीय असल्याचेही त्यांनी सांगितले.

भारतीय राज्यघटनेच्या निर्मिती प्रक्रियेसह यात अंतर्भूत विविध महत्वाच्या मुल्यांबाबत त्यांनी सविस्तर माहिती देत उपस्थितांना मार्गदर्शन केले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जागतिक मूल्य आणि भारतीय शाश्वत मूल्य यांची उत्तम सांगड घालत भारतीय संविधानाची निर्मिती केली असून उद्देशिका हा संविधानाचा गाभा आहे. उद्देशिकेतील मुल्यांचा अंगीकार देशातील नागरिकांनी करावा त्यामुळे देशातील 90 टक्के प्रश्न कायमचे सुटतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कुल ऑफ लॉच्या परिसरात संविधान उद्देशिका पार्क आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे लोकार्पण भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई, केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, विधी व न्याय राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, सामाजिक न्याय विभागाचे प्रमुख सचिव हर्षदीप कांबळे, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, माजी मंत्री नितीन राऊत, माजी खासदार जोगेंद्र कवाडे, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे-चवरे, संविधान उद्देशिका पार्क समितीचे अध्यक्ष गिरीष गांधी आणि या समितीचे सदस्य यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयात भारतीय संविधानाचे धडे गिरविले व संवैधानिक मूल्य कृतीमध्ये आणले त्याच महाविद्यालयात संविधान उद्देशिका पार्कचे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण होत आहे, ही अत्यंत महत्वाची व समाधानाची बाब आहे. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षात या पार्कची कार्यपूर्ती होवून जनतेसाठी खुला होत आहे ही त्यातही महत्वाची बाब आहे. भारतीय संविधानाने सक्षम लोकशाहीची रचना करुन येथील नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंत्र्य, मुलभूत अधिकार, समान संधीचा अधिकार व न्याय मिळवून देण्याची व्यवस्था केली आहे. यामुळेच संविधानातील मूल्यांवर चालत भारत देशाने जगात जागतिक स्तरावर चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याचा मान मिळविला आहे. उद्देशिका ही संविधानाचा गाभा आहे. यात निहीत मुल्यांचा सर्व नागरिकांनी अंगिकार करण्याची गरज आहे व संविधान उद्देशिका पार्कच्या माध्यमातून याची प्रेरणा येथे भेट देण्याऱ्या प्रत्येकाला मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाची नवीन इमारत बांधण्यात येईल तसेच संविधान उद्देशिका पार्कला आवश्यक सर्व सोयी सुविधा पुरविण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाने संविधान उद्देशिका पार्क उभारण्यासाठी पुढाकार घेतला व राज्य शासनाच्या अर्थ सहाय्याने आणि लोकसहभागातून ही उत्तम संकल्पना प्रत्यक्षात आली. या पार्कच्या माध्यमातून संविधानातील मौलिक विचार या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसह समस्त जनतेपर्यंत पोहचतील याचा महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी म्हणून सार्थ अभिमान व समाधान असल्याचे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले. नागपूर विद्यापीठाने देशाला प्रधानमंत्रांसारख्या महान व्यक्ती दिल्या. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाने सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश देशाला दिले. त्याच वास्तूमध्ये संविधान उद्देशिका पार्क उभे राहिल्याने या गौरवात वृध्दी झाल्याच्या भावनाही त्यांनी व्यक्त केल्या. विद्यापिठाच्या ई-ग्रंथालयासाठी त्यांनी एक कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणाही केली.

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी आपल्या भाषणात संविधान उद्देशिका पार्कच्या उभारणीसाठी सामाजिक न्याय मंत्रालयाच्या वतीने करण्यात आलेल्या अर्थ सहाय्यासहीत अन्यबाबींचा परामर्श घेतला. तत्पूर्वी सरन्यायाधीश भूषण गवई यांचा सत्कार करण्यात आला. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा संविधान उद्देशिका पार्क समितीचे अध्यक्ष गिरीष गांधी यांनी या वास्तूच्या निर्मितीतील विविध टप्प्यांची माहिती दिली. संविधान उद्देशिका पार्क समितीचे सदस्य पूरण मेश्राम यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे वाचन केले. विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे-चवरे यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्कूल ऑफ लॉचे संचालक डॉ. रविशंकर मोर यांनी आभार मानले.

### माजी विद्यार्थ्यांचा सत्कार

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विधी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधी व न्याय राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे, उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठाचे वरिष्ठ न्यायमूर्ती अनिल किलोर, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जी.एस. कुलकर्णी, न्या. भारती डांगरे, न्या. वाय. जी. खोब्रागडे, न्या. वृषाली जोशी, न्या. एम. एस. जावरकर, न्या. नितीन बोरकर, न्या. आर. एन लद्धा, न्या. ए.एन पानसरे आदींचा सत्कार करण्यात आला.

### असा आहे संविधान उद्देशिका पार्क

संविधान उद्देशिका पार्कच्या मध्यभागी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संविधान हातात धरलेली प्रतिमा स्थापित करण्यात आली आहे. उद्देशिका पार्कमध्ये संविधान उद्देशिकेतील भारतीय संविधान, आम्ही लोक, समाजवाद, धर्मनिरपेक्षता, लोकशाही, प्रजासत्ताक, न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता आदी दहा मूल्यांचे भित्तिचित्रे (म्युरल्स) लावण्यात आली आहेत. उद्देशिका पार्कमध्ये लोकशाहीचे मुख्य आधारस्तंभ असलेले राष्ट्रपती भवन, संसद भवन, सर्वोच्च न्यायालय यांच्या प्रतिकृती आणि अशोक स्तंभदेखील तयार करण्यात आला आहे. संपूर्ण संविधान प्रास्ताविका पार्क हा दोन एकर परिसरात साडेनऊ कोटी रूपये खर्चातून निर्माण करण्यात आला आहे. या पार्कमध्ये प्रवेश करण्यासाठी एक भव्य प्रवेशद्वार देखील उभारण्यात आले आहे.

## एअर इंडियाच्या विमान अपघातानंतर दुसऱ्या दिवशी कार्यालयात झाली पार्टी



**अहमदाबाद :** अहमदाबादमध्ये 12 जून रोजी सरदार वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळाहून लंडनसाठी उड्डाण घेतलेल्या एआय-171 या विमानाचा भीषण अपघात होऊन 270 हून अधिक लोकांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे संबंध देशात हळहळ व्यक्त केली गेली. मात्र दुसऱ्याच दिवशी एअर इंडियाच्या कार्यालयात कर्मचाऱ्यांनी पार्टी केल्याचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला होता. या व्हिडीओवर सोशल मीडियातून मोठ्या प्रमाणात टीका झाल्यानंतर आता एअर इंडियाच्या विमानतळ सेवा व्यवस्थापन कंपनीने (AISATS) मोठी कारवाई केली आहे. तसेच कर्मचाऱ्यांनी अपघाताच्या दुसऱ्या दिवशी नाचगाणे करून जल्लोष केल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली आहे. सिंगापूर स्टॅट्स लिमिटेडबरोबर ग्राउंड-हँडलिंग संयुक्त उपक्रम असलेल्या एअर इंडियाच्या AISATS या कंपनीचे कर्मचारी कार्यालयात पार्टी करताना एका व्हिडीओमध्ये दिसले. सदर व्हिडीओ नेमका कोणत्या तारखेचा आहे, यावर कंपनीने स्पष्टीकरण दिलेले नाही. मात्र 12 जूनच्या अपघातानंतर कार्यालयात पार्टी झाल्याचा दावा करण्यात येत आहे.

## आईने मूत्रपिंड दान करून मुलाचा जीव वाचवला



**अमरावती :** आई मुलाला जन्म देते, हे सर्वश्रुत आहे; पण तिनेच स्वतःचे मूत्रपिंड 18 वर्षांच्या आपल्या तरुण मुलाला देऊन त्याला पुन्हा जीवन दिल्याची घटना येथील विभागीय संदर्भसेवा रुग्णालयामध्ये (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) घडली. या रुग्णालयातील हे 54 वे यशस्वी मूत्रपिंड प्रत्यारोपण ठरले. बडनेरा येथील एका कुटुंबाची ही कहाणी. गौतम मुकेश प्रेमचंदानी हा 18 वर्षीय मुलगा मूत्रपिंडाच्या आजाराने त्रस्त होता. त्याच्यावर डायलिसिसचे उपचार सुरू होते. उपचार सुरू असूनही प्रकृतीत फारसा फरक पडत नव्हता. अखेर त्यांनी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलकडे धाव घेतली. त्याला डॉक्टरांनी मूत्रपिंड प्रत्यारोपणाचा पर्याय दिला. प्रत्यारोपणासाठी मूत्रपिंडाच्या प्रतीक्षेत सर्वजण होते. मूत्रपिंडाची प्रतीक्षा सुरू असताना अरुणच्या आईने मूत्रपिंड दान करण्याची तयारी दर्शविली. महात्मा फुले जन आरोग्य अभियानाद्वारे मोफत मूत्रपिंड प्रत्यारोपण करण्यात आले. आईने संमती दिल्यानंतर त्यांच्या रक्तगटाची तपासणी करण्यात आली. रक्तगट जुळल्याने ती मूत्रपिंड देऊ शकत असल्याचे निष्पन्न झाले.

## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी मुंबई चेंबूरमध्ये आज मानवी साखळी आंदोलन सुरू



**मुंबई :** आंबेडकरी चळवळीचा बालेकिल्ला चेंबूर पी एल लोखंडेमार्ग येथून महाबोधी महाविहार मुक्तीसाठी धरणे, मोर्चा आंदोलन करण्यात आली. आता पुढचे पाऊल रविवार दि. 29 जुन 2025 रोजी सकाळी 11.00 ते 1.00 वाजे पर्यंत मानवी साखळी आंदोलन सर्व पक्ष सामाजिक संघटना यांच्या वतीने करण्यात येणार आहे. अनेक कढी एकमेकात गुंतवून एक साखळी तयार होते. घट्ट बंद जोडणारी साखळी तयार होते. गेली 134 वर्षापासून बुद्ध गया महाबोधी महाविहार. महंत, पुरोहित आणि ब्राम्हणाच्या ताब्यातून मुक्त करण्यासाठी आंदोलन सुरू आहे. अभी नही तो कभी नही या निर्धाराने देश विदेश मधील बौद्ध उपासक उपशिका मोठ्या संख्येने या आंदोलनात सहभागी झाले आहेत. हे विश्वव्यापी जन आंदोलन पी. एल लोखंडे मार्ग येथे सतत कार्यक्रम आयोजित करून त्याची तीव्रता सतत तेवत ठेवली आहे. चेंबूर येथे महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यासाठी मानवी भिंत आणि मानवी साखळी उभी करण्यात येणार आहे. सर्व पक्ष, सर्व संघटना बौद्ध उपासक उपाशिका यांनी मोठ्या संख्येने मानवी साखळी एक एक कडी होऊन एकजुटीने मानवी साखळीच्या बुलंद शक्तीने ब्राम्हण महंत पुरोहित यांची सनातनी वर्चस्ववादी भिंत बी टी 1949 चा कायदा मोडीत काढून नाही कुणाच्या बापाचे आपल्या हक्काचे बुद्ध गया महाबोधी महाविहार मुक्त करण्यासाठी लाखोच्या संख्येने या मानवी साखळी आंदोलनात सकाळून 10, वाजता सफेद वस्त्र परिधान करून पी एस लोखंडे मार्गावर सहभागी होण्याचे महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन समिती पीएल लोखंडे मार्ग चेंबूर यांच्या वतीने जाहीर आव्हान करण्यात येत आहे.

## कर्मचाऱ्याला नोकरी बदलण्याचा अधिकार, कंपनी रोखू शकत नाही : दिल्ली उच्च न्यायालय




**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाने नोकरी बदलण्यासंबंधीत एका खटल्यात महत्त्वाचा निर्णय दिला आहे. एखाद्या व्यक्तीने नोकरी सोडल्यानंतर त्याला नवीन ठिकाणी नोकरी शोधण्यापासून रोखणारी नोकरीच्या करारातील कलमे ही वापरता न येण्याजोगी (void) ठरवली आहेत. यासाठी न्यायालयाने भारतीय करार कायद्यातील (Indian Contract Act) कलम 27 चा दाखला दिला आहे. म्हणजेच नोकरी सोडणाऱ्या कर्मचाऱ्याला कंपनी दुसरीकडे नोकरी करण्यापासून रोखू शकत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

एका सॉफ्टवेअर इंजिनियरच्या खटल्यात न्यायमुर्ती तेजस कारिया यांनी 25 जून रोजी हा निर्णय दिला आहे. या प्रकरणात संबंधित सॉफ्टवेअर इंजिनियर पूर्वी ज्या कंपनीत काम करत होता ती कंपनी 'नॉन-कंपीट क्लॉज' वापरून त्याला त्यांच्या ग्राहकाच्या संस्थेत रुजू होण्यापासून रोखण्याचा प्रयत्न करत होती. दरम्यान न्यायालयाने यावेळी निरीक्षण नोंदवले की, कर्मचाऱ्याला अशा परिस्थितीत टाकले जाऊ शकत नाही जेथे त्याला एकतर पूर्वीच्या कंपनीत काम करावे लागेल किंवा बेरोजगार राहावे लागेल. नियोक्ता-कर्मचारी करारात, नकारात्मक किंवा प्रतिबंधात्मक अटी या हे नियोक्त्याला कर्मचाऱ्यावर अधिक अधिकार देणाऱ्या असल्याचे दिसून येते आणि बहुतेक वेळा असे होते की कर्मचाऱ्याला एक स्टँडर्ड करारावर सही करावी लागते किंवा त्याला नोकरीवरच ठेवले जात नाही. नोकरीचा करार संपल्यानंतर नोकरी सोडलेल्या कर्मचाऱ्याच्या नवीन नोकरी शोधण्याच्या अधिकारावार निर्बंध लादणाऱ्या नोकरी करारातील अटी या भारतीय करार कायद्याच्या कलम 27 च्या विरोधात आणि स्वीकारता किंवा वापरता न येण्याजोग्या (void) आहेत असेही न्यायालयाने म्हटले आहे.

## महायुती सरकारमध्ये मतभेद! पाचवीपर्यंत हिंदी नको



**मुंबई :** राज्यात पहिलीपासून हिंदी सक्तीविरोधात जनतेत नाराजीचे वातावरण आहे. त्यातच पहिल्यांदाच मराठीच्या मुद्द्यावरून ठाकरे बंधू एकत्र येत असल्याने दोन्ही पक्षातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह आहे. येत्या 5 जुलैला राज ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वात मराठी भाषिकांचा मोर्चा निघणार आहे. या मोर्चाला कलाकार, साहित्यिकांपासून अनेक संस्थांनी पाठिंबा दिला आहे. त्यातच आता या मुद्द्यावरून महायुती सरकारमध्येच मतभेद असल्याचे चित्र दिसून येत आहे. राज्यात पहिली ते पाचवीपर्यंत हिंदी नको अशी भूमिका अजित पवारांच्या राष्ट्रवादीने घेतली आहे. काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हे मत मांडले होते. आता दादांच्या राष्ट्रवादीचे प्रवक्ते पुढे आले आहेत. यात मुख्य प्रवक्ते आनंद परांजपे म्हणाले की, लोकशाहीत विरोधी पक्षाला त्यांची बाजू मांडण्याचा अधिकार आणि स्वातंत्र्य आहे. हिंदीबाबत आमच्या पक्षाची भूमिका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केली आहे. पहिली ते चौथीपर्यंत हिंदी नको असे त्यांनी म्हटले आहे. आमच्या पक्षाशी स्पष्ट भूमिका मांडली आहे. पाचवीनंतर हिंदी असावी ही पक्षाची भूमिका आहे. मुख्यमंत्र्यांसोबत भेट होईल तेव्हा अजितदादा नक्कीच या विषयावर चर्चा करतील असे त्यांनी सांगितले.






# संघाची नकली सामाजिक न्याय परिषद आणि विवेक सावधान!




**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हॉल, कामठी रोड, नागपूर येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विवेक (नकली) मंचाने 29 जून रोजी ही भूल देणारी नकली न्याय परिषद आयोजित केली. संघी प्रचारक तीन समाजद्रोही महारांची विनीत म्हणून नावे असलेली झेरॉक्स निमंत्रण पत्रिका घेऊन एक ब्राम्हण संघी प्रचारक भिलगावच्या कुण्या वासनिकानी दिलेल्या मो. क्रमांकावर संपर्क करून हे महोदय घरी आले. मी या संघी लोकांची नस नस जाणतो. ते बोलण्यात फार गोड पण खोटारडे असतात. दिसायला फार सज्जन पण फार क्रूर आणि कपटी असतात. कितीही अपमान करा तरी ते आपला हेतू सोडत नाही इतके ते लिर्लज्ज असतात. कारण तो त्यांचा युद्ध नितीचा भाग असतो म्हणून आपणास सावध करण्यासाठी हा लेख प्रपंच आहे.**

कोणताही स्वाभिमानी न्यायप्रिय व्यक्ती या षडयंत्र असलेल्या फसव्या कार्यक्रमात जाणार नाही ही आशा व्यक्त करतो. आपल्यातील काही लोक येवढे निर्बुद्ध आणि मूर्ख आहेत की जिथे जाऊ नको असे कुणी सांगितले तर नेमके तेथे गेल्याशिवाय राहत नाहीत. तसे होणार नाही याची काळजी घ्या.

**सामाजिक न्याय :-** भारतीय संविधानात न्याय ही संकल्पना असून त्याची खात्री संविधान आपल्या देशातील जनतेला देते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले, पेरियार रामस्वामी नायकर, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, कर्मयोगी गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांनी सामाजिक न्यायाची जोरदार पाठराखण केली. स्वातंत्र्य, समता, बंधुता, निर्भयता, संधी मिळणे म्हणजे सामाजिक न्याय होय. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात कुठेही कोणासोबत जात, रंग, धर्म, भाषा, प्रांत या आधारावर भेदभाव आणि अन्याय केल्या जाणार नाही ही ग्वाही न्याय संकल्पनेत आहे.

**सामाजिक अन्याय :-** चातूर्वर्ण विषम समाज व्यवस्था वैदिक धर्माने स्वीकारली. त्यातून जातीयता, अस्पृश्यता, स्त्री दास्य, गरिबी, अन्याय, अत्याचार या बाबी निर्माण झाल्यात. त्यातून जातीय आणि धार्मिक दंगे अविरत निर्माण होतात. स्त्रियांची विटंबना होते. गरिबांचे आर्थिक शोषण होते. त्याचे नेतृत्व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जे विविध फ्रंट आहेत ते करतात. परंतु मी त्यातला नाही हे ठासून खोटे बोलतात. म्हणून सर्व सामान्य माणूस त्यांचे जाळ्यात अडकले जातात. आता त्यांचा जोर आंबेडकरवादी लोकांवर जास्त आहे. म्हणून ते आपल्या घरापर्यंत येतात. त्यांची कूटनीती समाजानी समजून घेऊन त्यांना रोखले पाहिजे.

**न्याय परिषद घेण्याचा नैतिक अधिकार नाही :-** सामाजिक न्याय परीषद घेण्याचा अधिकार विषमता मानणाऱ्या भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कपटी देशद्रोही लोकांना नाही. हे त्यांचे ढोंग आहे. लोकशाही, संविधान न मानणारे लोक न्याय परिषद घेत असतील तर त्यांना तो नैतिक अधिकार नाही. दारुडा व्यक्ती जसा व्यसनमुक्तीचा प्रचार करतो, भ्रष्टाचारी जसा देश भक्तीवर प्रवचन देतो, क्रूर व्यक्ती साधूचे साँग घेऊन दया, करुणा, क्षमा, शांती वर उपदेश करतो तशी ही न्याय परिषद आहे.

**विषमतेचे समर्थन :-** हे देशद्रोही भाजप संघिष्ट लोक विषमतावादी आहेत. ते लोकशाही, संविधान, धर्मनिरपेक्षता, संघराज्य पद्धती, समता, स्वातंत्र्य, बंधुत्व, न्याय मानत नाहीत. त्यांना समरसता हवी आहे.

**समरसता म्हणजे :-** समरसता म्हणजे आमचे नियमानुसार राहा. आमच्यात समरस व्हा. आमची धर्मांधता, अंधश्रद्धा, जातीयता तुम्ही मान्य करा. स्त्री दास्य मान्य करा. मनूस्मृति मान्य करा. तरच आम्ही तुम्हाला सोबत घेऊ. ही समरसता आहे. महाराष्ट्रातील मांग, चांभार, भंगी, खाटीक आणि आदिवासी, ओबीसी समाज यांनी मान्य केली. काही अपवाद वगळता त्यांच्यात समरस होतात. बौद्ध, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख लोक समरस होत नाहीत. म्हणून त्यांना त्रास दिल्या जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला विरोध करणारे हेच जंतू आहेत. आरक्षणाला विरोध करणारे त्यांना न्याय परिषद घेण्याचा नैतिक अधिकार नाही. आपण त्यांचा धिक्कार केला पाहिजे.

**ते रेटून खोटे बोलतात :-** कोणताही धोकेबाज माणूस खोटे बोलण्यात तरबेज असतो. जे बोलायचे ते करायचे नाही. जे करायचे ते बोलायचे नाही. हे त्यांचे वर्तन ओळखले पाहिजेत. सेवा करण्याचे ते ढोंग करतात. तेच आग लावतात आणि तेच विझवायला येतात. तेच मदत करून सहानुभूती निर्माण करण्यासाठी प्रयत्न करीत असतात. त्याला भाबळे लोक बळी पडतात. असे अनेक महार त्यांचे जाळ्यात अडकले आहेत. त्यांचा गैरवापर करून ते समाजात शिरतात आणि धोके करतात.

**निवडणूक आली की त्यांचा हा धंदा सुरू होतो :-** आता दिवाळीचे दरम्यान महानगर पालिका निवडणूक होणार आहे. त्याच्या तयारीला ते लागले आहे. बौद्ध लोक त्यांना मत देत नाहीत म्हणून ते असे उपक्रम करून संबंध वाढवतात. लाच देतात. मदत पाहिजे असेल तर सांगा. आपल्यात गरजू आणि भिकारचोट आहेतच. त्यांना हाताशी पकडून आपली संघ शक्ती खिळखिळी करतात. आधीच नको तेवढी संघ शक्ती खिळखिळी झाली आहे. त्यांचे दलाल निळा दुपट्टा घेऊन आपलेच नेतृत्व करीत आहेत. कुणी समता सैनिक दलाची टोपी घालतो आणि त्यांचे काम करतो. समाजानी ते ओळखले पाहिजे. दर निवडणुकीत पैसा कमावणे हा त्यांचा उद्योग आहे. हे कार्यकर्ते ओळखतात तरी त्यांना घेऊन आपण मिरवतो.

**लेखांक ११७**



अशोक सरस्वती बोधी
मो. 8530980741

**आठवले, कवाडे, सुलेखा परवडले :-** रामदास आठवले, प्रा. जोगेंद्र कवाडे, सुलेखा कुंभारे हे उघड उघड संघा बरोबर आहेत. त्यांचेपासून आपण सावध राहतो. पण लपून जे वावरतात ते या दलालांपेक्षा जास्त घातक आहेत. त्यांना ओळखून त्यांचेपासून दूर राहा. आपल्या स्वातंत्र्यासाठी आणि अस्तित्वासाठी हे गरजेचे आहे.

**ही परिषद म्हणजे एक कपट :-** ही साधी घटना समजू नका. पत्रकात त्यांनी बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर, रविदास, अण्णा भाऊ असे अनेक फोटो टाकले, त्यात हेडगेवार घुसवले. न्यायाचा सत्यानाश करणारे मनुवादी न्याय परिषद घेऊन दुधात मीठ टाकत आहेत, म्हणून सावधान. ■ ■

# बाल संस्कार शिबीर म्हणजे उद्याची भावी पिढी तयार करणारा कारखाना...

**भावी पिढी तयार करण्यासाठी आजच संस्कार करण्याची गरज असते तरच उद्याचा विवेकी, समजदार जागृत आणि सामाजिक बांधिलकी असणारा युवक तयार होतो. मात्र त्यासाठी सातत्याने काम करण्याची गरज आहे. आंबेडकरी समाजामध्ये आपल्याला बघायला मिळते की आई वडिलांची जी जबाबदारी आहे मुलांना संस्कारीत करण्याची तिथे मुले तयार होतांना दिसत नाही.**

मोठ्या प्रमाणामध्ये व्यसनाधीन झालेली, वाममार्गाला लागलेली, दिशाहीन झालेली दिसतात. त्यामुळे आज बाल संस्कार वर्ग घेणे, विहारांमधून हे वर्ग चालवण्यात येणे, संस्कार शिबिर घेणे याची अत्यंत निकट आहे. मात्र हे लक्षात येते की असे प्रयत्न तितकेसे होत नाही, त्यामुळे आज आपल्यापुढे समाजाचे अनेक प्रश्न आ वासून उभे झालेले दिसतात. हे प्रश्न सोडवण्यासाठी गरज आहे ती सामाजिक भान असणाऱ्या दक्ष लोकांनी समोर येण्याची. असे प्रयत्न होतच नाही असे म्हणता येणार नाही. मात्र त्याचे प्रमाण कमी पडतात. फुले-आंबेडकरांचा विवेकी विचार मुलांमध्ये भिडला तर निश्चितच हे उद्याचे युवक हे समाजाचे आधारस्तंभ बनतील आणि ते आपली जबाबदारी नीटपणे ओळखून, सामाजिक चेतना पसरवण्याचा, सामाजिक दायित्व ओळखण्याचा प्रयत्न करतील.




या बाल संस्काराची गरज म्हणूनच मागील वीस वर्षापासून संत गाडगेबाबा बहुजन विकास आश्रम, जरुड, तालुका वरुड विविध जिल्ह्यांमध्ये आठ दिवसाचे निवासी बाल संस्कार शिबिर घेते. यामध्ये रामटेक, खिंडसी, केळकर, कोराडी, वर्धा, कळमेश्वर, माथनी, मौदा, गोंडखैरी आणि शांतीवन चिंचोली इ. अशाप्रकारे विविध ठिकाणी या शिबिरांचे आयोजन केले जाते.

यावर्षी तर अतिशय प्रेक्षणीय स्थळ असणारे महत्त्वाचे ठिकाण म्हणजे डॉ. बाबासाहेबांचे वस्तू संग्रहालय असणारे चिचोली या ठिकाणी अतिशय देखण्या परिसरामध्ये सुसज्ज इमारतींमध्ये हे शिबिर घेण्यात आले. यात 157 मुलांची नोंदणी होती. सोबतच निवासी पाली प्रशिक्षण शिबिर देखील घेण्यात आलेले होते. आज पाली विषयी जागृती करण्याची देखील अतिशय आवश्यकता आहे आणि म्हणूनच बुद्ध विहार समन्वय समितीच्या अंतर्गत पाली भाषा प्रचार समिती, राज्यभरातूनच नव्हे तर राज्याच्या बाहेर देखील उदंड प्रतिसाद मिळतोय. कारण पाली भाषा अवगत झाल्याशिवाय बुद्ध वचन कळू शकत नाही आणि जोपर्यंत बुद्ध वचन अवगत होत नाही तोपर्यंत आपल्याला कल्याणाचा मार्ग मिळणार नाही. म्हणूनच खरे तर बुद्ध वचन असणारे पालीभाषा ही आपल्याला समजून घेणे ही काळाची गरज आहे आणि त्यामुळेच पाली भाषा प्रशिक्षण शिबिर देखील चिंचोलीला यावेळी सोबतच घेण्यात आले. यासाठी अगदी मुंबईपासून तर गडचिरोलीपर्यंत विविध जिल्ह्यातल्या जवळपास 57 उपासक उपासिका याकरता उपस्थित होते. आचार्य राजेंद्र भालशंकर सर नाशिक आणि आचार्य ढेंगळे सर, चंद्रपूर यांनी अतिशय सुंदर असे पालीचे वर्ग घेतले आणि बुद्धवचन समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी अमूल्य असे सहकार्य केले. बाल संस्कार शिबिरांमध्ये तर दिवसभरासाठी ज्ञानाची मेजवानी असते. ज्यामध्ये भाषण कसे करावे, निबंध लेखन कसे लिहावे? गीत गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, विविध प्रकारचे क्राफ्ट, हस्तकौशल्य विकसित होण्यासाठी वर्ग, अभिनय स्पर्धा, एकांकिका, नाटिका, विविध विषयावरचे तज्ञ मार्गदर्शक येतात आणि ते मार्गदर्शन करतात. ज्यातून विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन आणि सामाजिक भान आपली जबाबदारी आणि आपले कर्तव्य समजण्यासाठीच्या दृष्टीने सुंदर असे भाषणे देवून मार्गदर्शन होते. ज्यामध्ये अनेक तज्ञ मान्यवर आपापल्या विषयाला न्याय देतात. या दहा दिवसीय शिबिरामध्ये मुलांची एकमेकांशी खूप चांगली मैत्री होते. चांगले मित्र लाभणे ही देखील आजचे काळाची गरज आहे आणि ही मैत्री ही मुले पुढे टिकवतात. चांगले मित्र मिळाले याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर असतो. आठ दिवसानंतरही हे शिबिर असेच चालू राहावे असे देखील अभिप्राय येतात. मात्र हे शिबिर घेणे आणि त्याला यशस्वी करणे हे सोपे काम नव्हे. मात्र मान्यवर अशोकभाऊ सरस्वती यांच्या मार्गदर्शनामध्ये आजवर एकूण 14 शिबीर झालीत. त्यामध्ये शंभरच्या वरती मुले मुली, निवासी आठ दिवस राहतात. त्यांना सांभाळणे त्यांच्या जेवणाचा खर्च, दोन वेळचे जेवण, दोन वेळचा नाश्ता आणि सोबत सगळ्या प्रकारच्या सुविधा पुरवणे त्यासाठी खूप मोठे दातृत्व आणि सामाजिक भान आणि खपण्याची झिजण्याची हिंमत लागते. ती हिम्मत आद. अशोकभाऊ आणि त्यांच्या सहचारिणी डॉ. प्रमिलाताई चिंचखेडे दाखवतात आणि या बालसंस्काराची निकट म्हणून त्यांनी हे काम हाती घेतलेले आहे. यांच्यासोबत अनेक शिक्षकांची गरज असते. ज्यात सतीश गायकवाड, बबीता गायकवाड यांच्या सोबत आयोजनामध्ये सावित्री नाखले, सुषमा पाखरे, जया भगत, उषा म्हात्रे, वनिता कराडे, सुविता लोखंडे आणि या सगळ्यांमध्ये अतिशय महत्त्वाची भीमराव म्हैसकर सर, प्रा. भारत शिरसाट सर यांनी आठ दिवस निवासी राहून या मुलांसाठी ज्ञानदानाचे कार्य केले. सामाजिक भान असणे आणि झिजने या दोन्ही गोष्टी सोबत असल्याशिवाय आपण अशा निवासी शिबिराचे आयोजन करू शकत नाही किंबहुना कुणी त्यासाठी पुढे येऊ धजावत नाही आणि म्हणूनच आपल्याला असे शिबिर बघावयास मिळत नाही.



सुषमा पाखरे
मो. 8149929496

मात्र या शिबिरांची गरज अतिशय जास्त आहे. जेव्हा जेव्हा मुलांचे रिप्लाय येतात तेव्हा ते म्हणतात की, आम्ही बऱ्याच गोष्टी शिकलो. त्यांच्यात राहणे, बोलणे, चालणे, वागणे एकंदरीतच सगळ्या स्वभावामध्ये बदल झालेला दिसतो. या बालसंस्कारातून अनेक मुले घडले. चांगल्या नोकरीला लागलेत आणि सोबतच ही मंडळी सामाजिक दायित्व ओळखून आजही आपापल्या ठिकाणी सामाजिक कार्य करत आहेत. हेच खरे तर या बाल संस्कार शिबिलाचे फलित होय. आज अशा प्रकारची संस्कार शिबिर सर्व जिल्ह्यांमधून, तालुका मधून छोट्या छोट्या गावांमधून व्हायला पाहिजे. मात्र यासाठी कोण बरे पुढे येईल? कोण बरे सामाजिक भान ओळखून खपण्याची, झुंजण्याची भूमिका ठेवून या लेकरांसाठी खपेल? कोण बरे? कोण बरे? ■ ■

# निवडणुका आणि निष्ठावंत कार्यकर्ते

**सध्या सर्वत्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची जोरदार चर्चा सुरू आहे. येणाऱ्या काही महिन्यात पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, नगरपंचायत यांच्या निवडणुका होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे सर्व राजकीय पक्ष आणि त्यांचे कार्यकर्ते उत्साहात असून आपल्यालाच तिकीट मिळेल अशी आशा प्रत्येक पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता बाळगून आहे. त्यामुळे प्रत्येक पक्षाच्या निष्ठावंत व प्रामाणिक कार्यकर्त्यांनी आपापल्या मतदारसंघातील मतदारांच्या भेटीगोटी घेणे सुरू केले आहे. तसेच छोटे मोठे उपक्रम राबवून आपली जाहिरात करणे सुद्धा सुरू आहे.**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या प्रत्येक पक्षाच्या लहान कार्यकर्त्यांसाठी अतिशय महत्त्वाच्या असतात. या निवडणुका लढण्याची प्रत्येक पक्षाच्या सामान्य कार्यकर्त्यांची तीव्र इच्छा असते. कारण लोकसभा आणि विधानसभेत आपल्या साहेबांसाठी अतिशय प्रामाणिकपणे आणि जीव तोडून मेहनत करणाऱ्या कार्यकर्त्यांना या लहान निवडणुकांमध्ये आपल्याला निश्चित तिकीट मिळेल व आपण निवडून येऊ अशी आशा तो बाळगून असतो. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या प्रत्येक पक्षाच्या लहान कार्यकर्त्यांसाठी राजकारणाची पहिली इनिंग खेळण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असतात.

सध्या देशातील राजकारण पूर्णपणे बदललेले आहे. राजकारण हे पूर्वीसारखे सोपे आणि तत्वाचे राहिलेले नाही. तसेच पक्षासाठी अतिशय निष्ठेने आणि प्रामाणिकतेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना आपल्या कामाचे फळ मिळेल याची कोणतीही गॅरंटी नाही. कारण सध्या राजकारणात निष्ठा आणि प्रामाणिकतेपेक्षा पैसा अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. त्यामुळे तिकीट वाटपात शेवटच्या क्षणी निष्ठेपेक्षा पैसा श्रेष्ठ ठरतो आणि अनेक वर्षापासून पक्षात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलून वेळेवर एकदम नवीन चेहऱ्याला तिकीट दिली जाते. त्यामुळे कित्येक वर्षापासून आपल्या पक्षासोबत प्रामाणिक असणाऱ्या कार्यकर्त्यांचा हिरमोड होतो. सध्याचे राजकारण हे भरवशाचे राहिलेले नाही. वेळेवर काय होईल आणि कोण कोणत्या पक्षात प्रवेश करेल आणि कोणाला तिकीट मिळेल याची कोणीच शाश्वती देऊ शकत नाही. त्यामुळे कित्येक दिवसापासून तिकिटाची वाट पाहत असणाऱ्या आणि आपल्याला तिकीट मिळते याची शंभर टक्के खात्री असणाऱ्या कार्यकर्त्यांचे वेळेवर जेव्हा तिकीट कापल्या जाते तेव्हा पक्षासाठी व आपल्या नेत्यासाठी अनेक वर्षापासून इमानदारीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची काय अवस्था होत असेल हे फक्त तो कार्यकर्ताच समजू शकतो.






प्रेमकुमार बोके
9527912706

सामान्य कार्यकर्त्यांच्या बळावरच राजकीय नेते मोठे होतात. मोठमोठी पदे प्राप्त करतात. आपल्या नेत्यांसाठी कार्यकर्ते काहीही करायला तयार असतात. त्यासाठी दुसऱ्या पक्षाच्या लोकांसोबत भांडणे अंगावर घेतात आणि आपल्या नेत्याला सर्वच प्रकारे मोठे करतात. आपल्या नेत्यासाठी सर्वस्व पणाला लावणाऱ्या कार्यकर्त्यांना जेव्हा तिकीट द्यायची वेळ येते तेव्हा हेच नेते आपल्या कार्यकर्त्यापेक्षा दुसऱ्या पक्षातून आलेल्या पैसेवाल्या लोकांना तिकीट देऊन आपल्या कार्यकर्त्यांच्या कष्टाचा आणि निष्ठेचा अपमान करतात. राजकीय पक्षाचा कार्यकर्ता अनेक वर्षपर्यंत आपल्या पक्षाच्या नेत्यांसाठी तन-मन-धनाने काम करीत असतो. पण त्याला मात्र स्थानिक स्वराज्य संस्थेची एखादी तिकीट मिळविताना सुद्धा सर्व काही पणास लावावे लागते. आपल्या नेत्यांची मनधरणी करावी लागते. परंतु तरीसुद्धा तुझ्याकडे निवडणुकीसाठी पुरेसा पैसा नाही हे कारण सांगून त्याचे तिकीट कापले जाते आणि पक्षासाठी कोणतेही योगदान नसणाऱ्या लोकांना केवळ पैसे आहे म्हणून तिकीट दिले जाते. त्यामुळे आज सामान्य कार्यकर्त्यांचा राजकीय पक्षाच्या नेत्यांवरील विश्वास उडालेला आहे. आज पूर्वीसारखे नेत्यांचा आदर सन्मान करणारे कार्यकर्ते फार कमी पाहायला मिळतात. कारण त्यांना आपल्या नेत्यांचा पुरेपूर अभ्यास झालेला असतो व आपला नेता कधीही आपला पत्ता कट करू शकतो याची त्याला माहिती असते.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार करता सध्या महाराष्ट्रात राजकीय पक्षांची संख्या खूप वाढलेली आहे. तसेच पक्षांतर करणारे लोकही खूप झाले आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत कोणत्या पक्षाचा कार्यकर्ता कोणत्या पक्षाच्या तिकिटावर उभा राहील याची आता काही खात्री राहिलेली नाही. तसेच वेळेवर पक्ष बदलणारे ही खूप असतात. त्यामुळे पक्षनिष्ठ असलेल्या कार्यकर्त्यांना तिकीट मिळवणे हे महाकठीण आहे. आपल्या कार्यकर्त्यांना जर खुश करायचे असेल तर महायुती किंवा महाविकास आघाडी न करता प्रत्येक पक्षाने स्वतंत्रपणे निवडणुका लढविल्या पाहिजे आणि पक्षासोबत प्रामाणिक असणाऱ्या कार्यकर्त्यांना तिकीटा देऊन त्यांनाही वेगवेगळ्या सभागृहात जाण्याची संधी दिली पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने कार्यकर्त्यांच्या कामाचा आणि निष्ठेचा सन्मान केल्याचे समाधान नेत्यांना मिळू शकते. ■ ■

# आठवांचा ठेवा जपणारा स्मृतीगंध

**आपल्या लेखणीद्वारे सातत्याने आनंद पेरण्याची वृत्ती ठेवणाऱ्या प्रणोती कळमकर यांचा हा पहिलाच लेखसंग्रह....! यापूर्वी काही काव्य लेखन झाले असून कवितासंग्रह ही प्रकाशित आहे. गद्य लेखनाच्या प्रांतात स्वानुभव, प्रासंगिक, व्यक्ती विशेष तसेच दिनविशेष या गोष्टी त्यांना लिहायला भाग पडतात, असे लक्षात येते. त्यांचे विविध लेख अनेक वृत्तपत्रांमध्ये प्रकाशितही झालेले आहेत. या सर्व पूर्वप्रकाशित लेखांचा संग्रह व्हावा, असे वाटणे साहजिकच आहे. त्यांच्या अशा साहित्यिक जाणीवातून आज आकारास येत असलेल्या ‘स्मृतीगंध’ या लेखसंग्रहाकरता मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करते.**

मानवी जीवनाला स्पर्श करणारे अवतीभवतीचे सर्वच विषय हे त्यांच्या लेखनाचे विषय ठरलेले आहेत आणि कोणताही लेख लिहिताना तो केवळ हाता वेगळा करणे ही भूमिका न ठेवता त्यावर अभ्यासपूर्ण माहिती आणि नोंदी नोंदवत लेखन करणे या त्यांच्या स्वभावानुसार त्यांनी हे लेखन केलेले असल्यामुळे ते वाचनीय तर आहेतच परंतु संदेशात्मकही आहेत. जीवनाच्या वाटेवर सुखदुःखाची वळणे येणारच. परंतु प्रत्येक वळणाला पार करून जीवन सुखी करणे हे पूर्णतः मानवी मनाच्या अधीन आहे. मन प्रसन्न असेल तरच जीवनाचा आनंद घेता येतो.. अन्यथा सारे व्यर्थ आहे. ‘मन करा रे प्रसन्न’ या लेखांमध्ये अशा आशयाची बांधणी प्रणोती कळमकर यांनी नितांत ताकदीने केलेली आहे. आपल्या अवतीभवतीचा निसर्ग आपल्याला बरेच काही शिकवत असतो ज्यामुळे विश्वबंधुत्वाची भावना आपोआपच निर्माण होते. मनाशी.. मनाने.. मनाचा केलेला करार पूर्णत्वाला नेता आला की जगणे सुरेख होते. आकाश पाताळ एक करण्याचे सामर्थ्य अंर्तमनामध्ये असते परंतु अंर्तमन भरकटले तर केवळ बर्हिमनाच्या आधारे हे साध्य करणे अशक्य असते.. म्हणून अंर्तमन कल्पतरू आहे. ते आनंदी असेल तरच मनामध्ये हास्याचे फुल उमलते.

‘हास्य तरंग’ या लेखाअंतर्गत त्यांनी जगण्यातील हास्याचे महत्त्व विषद केलेले आहे. एकूणच मनाचा आनंदाशी संबंध जोडता आला तरच जगण्यात समाधान प्राप्त होते. असा आशय- ‘समाधान हे श्रेष्ठ धन’ या लेखांमध्ये मांडलेला आहे. हास्य रहस्य, मौनम सर्वार्थ साधनम, आनंदाचे डोही..., अहंकार, आशीर्वाद यासारख्या लेखांमधून जगण्याचे फार मोठे तत्त्वज्ञान मांडण्याचा प्रणोती कळमकर यांनी प्रयास केलेला आहे. संसाररूपी रथाचे स्त्री आणि पुरुष ही दोन चाके आहेत. ती दोन्ही चाके एकाच दिशेने आणि एकाच वेगाने चालली तरच भावसागर पार होतो परंतु सनातन काळापासून पुरुषांच्या तुलनेत स्त्रीला दिल्या गेलेले दुय्यम स्थान.. आणि तिची सर्वच पातळीवर झालेली अवहेलना.. याचाही विचार करणारे लेख या लेखसंग्रहात आहेत.- ‘ढोल, पशु और नारी सारे ताडन के अधिकारी’ असे तुलसीदास यांनी म्हटले आहे. त्याचप्रमाणे स्त्रीकडे पाहिल्या जात आलेले आहे. सनातन काळापासूनच तिला समाजामध्ये दुय्यम स्थान देण्यात आलेले आहे. रांधा, वाढा, उष्टी, खरकटी करण्यातच तिचा सारा जन्म गेला त्यामुळे तिने स्वतःच्या बाबतीतही विशाल विचार कधी केलाच नाही. परंतु तिच्यातील प्रतिभा... तिच्यातील सहनशीलता, शोषकपणा... नम्रता या गुणांमुळे उजळून निघाली. ती प्रसंगी संकटाशी दोन हात करत असूराचे निर्दालन करण्याची शक्ती ही आहे... या जाणिवा प्रगल्भ झाल्या... तेव्हा तिचे जगणे सुसह्य झाले. हे वास्तव आहे. याबाबतचा स्त्री जीवनाचा उभा आलेख ‘बाई पण भारी’ या लेखांमध्ये सुरेख रित्या मांडलेला आहे. खरेच स्त्री ही घराचा कणा असते आणि तिचेच आरोग्य ठीक नसेल तर ती संपूर्ण घराचे आरोग्य कसे काय ठीक राहू शकेल..? परंतु दुर्दैवाने तिच्या आरोग्याकडे लक्ष देण्यात येत नव्हते. तिने आपले आरोग्य... त्या बाबतच्या समस्या आणि उपाय याबाबतचा चष्मा लावलेला आहे. हा एक नवा दृष्टिकोन देणारा लेख यामध्ये आहे. समाज कितीही बदलला तरी समाजातील रूढी आणि परंपरा जुन्या विचारांना खतपाणी घालतात. त्यातील एक विचार म्हणजे स्त्रीचे वैधव्य होय. केवळ अलंकारांनी खुलते ते सौभाग्य नव्हे... हे सांगण्याचा प्रयास ‘स्त्रीचे सौभाग्य’ या लेखातून केलेला आहे. त्याच वेळेला स्त्रीला असलेल्या आत्मसन्मानाची जाणीव ‘पाहुणी की आश्रित’ या लेखांमधून सुरेख प्रकारे मांडलेली आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये स्त्रीला अतिशय सन्मानाचे स्थान आहे. सारी नातीगोती सांभाळण्याचे महत्वाचे काम तिलाच करावी लागते. वसुंधरा सुद्धा स्त्री आहे. त्याप्रकारे सणावारांचे प्रयोजन करण्यात आलेले आहे. साऱ्या विश्वामध्ये भारतीय संस्कृतीला विशेष महत्त्व आहे. मानवाने जीवन कसे जगावे..? त्यात आनंद कसा निर्माण करावा..? निसर्गाचे ऋ ण कसे मानावे..? नात्यांचा सन्मान कसा राखावा..? हा सर्व समतोल राखून ठेवण्याकरिता सणावारांचे आयोजन केले जाते. विशिष्ट वेळी विशिष्ट सणांचे विशिष्ट महत्त्व जाणीवपूर्व पेरल्या गेलेले आहे. प्रणोती कळमकर यांनीही काही महत्त्वपूर्ण सणावारांचा उल्लेख करणारे लेख या लेखांमध्ये ह्या लेख संग्रहामध्ये समाविष्ट केलेले आहे. प्रणोती कळमकरांनी नेमके हेच हेरून आपल्या लेखसंग्रहात महत्त्वाच्या संस्कृती जतनाचे कार्य केलेले आहे. त्याचप्रमाणे रोजचे कॅलेंडर आज च्या दिवसाचे वेगळेपण सांगत असते. त्यामुळे काही वैशिष्ट्यपूर्ण दिवसांवरही त्यांनी चिंतन मनन केलेले आहे. मराठी भाषा ही राजभाषा आहे परंतु तिला स्वतःचा अभिजात दर्जा मिळवायला अनेक वर्ष संघर्ष करावा लागला... तेव्हा कोठे 3 ऑक्टोबर 2024 रोजी शासन दरबारी अभिजात दर्जा प्राप्त झालेला आहे. या मराठी भाषेच्या गुणगौरवार्थ ‘मराठी राजभाषा गौरव दिन’, आपल्या एकूण जगण्यामध्ये टपाल खात्याचे असलेले महत्त्व म्हणून ‘टपाल दिन’ आणि आपली प्रत्येक कृती ही विज्ञानाशी कशी संबंधित आहे...? याबाबतची जाणीव प्रत्येकाला व्हावी म्हणून ‘विज्ञान दिना’ची महती व्हावी म्हणून या दिनांवर प्रकाश टाकणारे लेख यात समाविष्ट आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहून पारित केल्यामुळे आपल्या प्रत्येकाच्या मनात स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व भावाच्या जाणिवा प्रगल्भ झाल्या त्यामुळे ‘संविधान दिना’ नमस्कार वरही प्रकाश टाकलेला आहे आणि निसर्गाने दिलेला सर्वच ऋतूंचा गर्भितार्थ आढावा घेत वसंत ऋतूचा भरपूर वृत्तांत मांडणारा ‘मनभावन वसंत’ हा लेख लिहिलेला आहे. संपूर्ण पृथ्वी पालथी घालणे आपल्या कुणाला शक्य नाही परंतु आपल्या एका आयुष्यामध्ये जितका प्रवास करून निसर्गाला न्याहाळता येणे शक्य आहे तेवढे आपण केलेच पाहिजे. निदान जगभ्रमंती होऊ शकली नाही तरी आपल्या भारतातील महत्त्वाच्या ठिकाणांपर्यंत आपण पोहोचलेच पाहिजे. अशी इच्छा प्रत्येकाच्या मनामध्ये जागी राहावी. यादृष्टिकोनातून प्रणोती कळमकर यांनी स्वतः आसाम, मेघालय, अरुणाचलप्रदेश या ठिकाणी केलेल्या प्रवासवर्णनांना सुरेखरित्या आपल्या लेखणीमध्ये बांधलेले आहे... त्याच प्रकारे अंदमान निकोबार या ठिकाणी भेट देतांना मनाची होणारी उलाघाल सुरेखरित्या व्यक्त केलेली आहे.



प्रा. विजया मारोतकर
मो. 8329587600

आपला सभोवताल टिपतांना मानवी मनाची संवेदनशीलता, मानवी मनाचा निर्धार, स्वभाव हे सारेच त्यांच्या लेखनाचा भाग होत असतात. नितांत संवेदनशील विचारांच्या प्रणोती कळमकर यांनी काही व्यक्तिरेखांना आपल्या लेख संग्रहात लिहिले नसले तरच नवल...! त्यानुसार त्यांनी समाज विषयक, राष्ट्रविषयक, कलाविषयक, मैत्री, नाते अशा वेगवेगळ्या पातळ्यांवरील व्यक्तिरेखा निवडून त्यांच्यावरही आपले मत... नव्हे अभिमत व्यक्त करणारे लेख लिहून या लेखसंग्रहात समाविष्ट केलेले आहेत. ज्यांच्या मातृत्वामुळे आज आपण दिमाखाने महाराष्ट्रात जगतो आहे त्या छत्रपती शिवरायाला घडविणाऱ्या राजमाता मा जिजाऊ, स्त्री शिक्षणाची दारे उघडे करून देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीआई फुले, आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या सर्व बाजूंनी समाज सेवा करणाऱ्या अहिल्याबाई होळकर, खेड्याकडे चला... खेड्यांचा विकास होईल तरच सर्वांचा विकास होईल... हे सांगणारे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, सर्वधर्मसमभाव सांगणारे स्वामी विवेकानंद, या महान विभूतींच्या कार्याची महती त्यांच्यावरील लेखांमधून केलेली आहे.




आपले आरोग्य तेव्हाच काटक आणि सुयोग्य राहू शकते जेव्हा जगण्याला व्यायामाची आणि योग साधनेची जोड असेल... कायम असा मूलमंत्र देणारे योगगुरु विठ्ठलराव जीभकाटे यांचा एकूणच जीवनाबाबत सुरेख लेख लिहिला आहे... त्याच वेळेला सुरसम्राज्ञी आशाताई भोसले, मराठी साहित्य समृद्ध करणाऱ्या कवयत्री शांताबाई शेळके, अभिनयाचे दालन समृद्ध करणारे विक्रम गोखले लावणी सम्राज्ञी सुलोचना बाई चव्हाण, राजकारणाच्या राजघराण्यातील खणखणीत नाण विजयालक्ष्मी पंडित.. यासारख्या व्यक्तिमत्त्वांचा वेध घेऊन या लेखसंग्रहाचे वैभव वाढविले आहे. त्याचप्रमाणे डॉ. सुनंदा जुलमे, डॉ. स्मिता मेहत्रे, डॉ. विणा राऊत यांच्याबाबतच्या गुणवैशिष्ट्यांचा उल्लेख करणाऱ्या लेखांचा समावेश आहे.

जगात सगळ्यात चांगले बाबा कुणाचे ? तर केवळ ते माझे.. म्हणून आपल्या विद्वान, प्रतिभावंत पित्याबाबत शब्दसुमने साकारली.. त्याच वेळेला मातृ ऋणातून कधीच उतराई होऊ शकत नाही याची जाणीव ठेवत - ‘न ऋण जन्मदे चे फिटे’ हा लेख लिहिला आहे. आईचे संस्कार, आईचा प्रेमळ स्वभाव, आईची शिकवण, आईचेआशीर्वाद आणि तीन भावंडांची लाडाची एकुलती एक बहीण... आईची मुलगी या आविर्भावात आई प्रति व्यक्त केलेल्या नितांत संवेदनशील भावना या लेखात व्यक्त केलेल्या आहे. एकूणच प्रासंगिक आणि व्यक्ती विशेष लेखन हा प्रणोती कळमकर यांचा लेखनाचा स्थायीभाव राहिलेला आहे आणि त्यामुळे हे लेखन उत्कृष्टरित्या त्यांच्या लेखणीतून उतरलेले आहे. हे सर्व लेख त्या-त्या प्रसंगी लिहिल्या गेल्यामुळे प्रत्येक लेखाला न्याय पण दिल्या गेलेला असल्याचे जाणवते. 55 लेखांचा समावेश असलेल्या या लेखसंग्रहाच्या प्रत्येक लेखांमध्ये सकारात्मक विचार करण्याचा प्रयास प्रणोती यांनी केलेला आहे. गद्य आणि पद्य लेखनाचा बाज सांभाळत शक्य होईल ते या लेखणीने आनंद निर्माण करण्याचा प्रयास त्यांचा आहे. मायमराठी नक्षत्र प्रतिष्ठानच्या त्या सक्रिय सदस्य आहेत, याचा मला नक्कीच अभिमान वाटतो. त्यांची लेखणी कधीच थांबत नाही... नव्हे तर सेवानिवृत्तीनंतर या लेखणीचा वेग वाढलेला आहे. वाचन आहेच परंतु वाचनांचा आवाका वाढला तर लेखनाला आणखी उंची प्राप्त होऊ शकते. प्रणोती कळमकर यांनी कायम लिहत राहावे... मराठी साहित्याच्या दालनात त्यांच्या या लेखसंग्रहाचे भरभरून स्वागत होईल.. अशी अपेक्षा बाळगते. ■ ■

“ सौम्य शब्दांनी कठोर हृदय देखील जिंकता येतात. ”



# समता वृत्तपत्र वर्धापन दिन

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या अनेक संघटनापैकी 'समाज समता संघ' ही आगळी वेगळी संघटना होती. 4 सप्टेंबर 1927 रोजी समाज समता संघाची स्थापना करण्यात आली. संघाचे मुखपत्र म्हणून समता वृत्तपत्राचा पहिला अंक 29 जून 1928 रोजी प्रकाशित झाला होता. आज वर्धापनदिन निमित्ताने वाचकांसाठी विशेष लेख.*

आंबेडकरी चळवळीच्या या कालखंडात ब्राम्हणांसहित स्पृश्य जातींच्या अनेक विचारवंतांनी डॉ. बाबासाहेबांचे नेतृत्व स्वीकारून ब्राम्हणीझमचा नायनाट करण्याचा व समाजात 'समता' प्रस्थापित करण्याचा दृढ संकल्प केला होता. हजारो ब्राम्हण तथागतांना शरण जाऊन बौद्ध भिक्खू झाल्यासारखेच हे उदाहरण होय. लोकमान्य टिळकांचे चिरंजीव श्रीधरपंत व रामभाऊ हे समाज समता संघात सामील झाले होते. यांच्याशिवाय, ब्राम्हण-ब्राम्हणेतर समता पत्राचे संपादक देवराव नाईक, भा. र. कद्रेकर, डॉ. आर. एन. भाईदरकर, एस. एस. गुप्ते, बी. व्ही. प्रधान, आर. डी. कवळी, एफ. डी. सिल्हव्हा, व्ही. आर. चोनकर, डी. विठ्ठलराव प्रधान, पी. पी. ताम्हणे, आर. जी. प्रतापगिरी, जे. पी. मुळे, एन. व्ही. खांडके., डी. बी. सुभेदार, आर. एम. कर्णिक, बापुसाहेब सहस्त्रबुद्धे, सी. ना. शिवतरकर, केशव सिताराम ठाकरे, सौ. चौधरी, मो. व. देशमुख, गोविंदजी परमार, कृ. म. काळोखे, श्री. खोलवडीकर, गंगावणे, र. दे. बनकर, आसयेकर, राममूर्ती प्रतापगिरी व मिसेस प्रतापगिरी, जी. आर. प्रधान, भा. वि. प्रधान, भा. र. प्रधान, द. वि. प्रधान व सौ. मनोरमाबाई प्रधान, के. व्ही. चित्रे आदी इत्यादी प्रसिद्ध स्पृश्य आणि अस्पृश्य लोक या संघाशी संबंधित होते. अस्पृश्यता आणि जातिभेद शिगेला असलेल्या काळात स्पृश्य हिंदूनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वातील समाज समता संघात सहभागी व्हावे, याचे अनेकांना आश्चर्य वाटेल. पण 'जन्मसिद्ध मानवी 'समता' ही जातिभेद, लिंगभेद, पंथभेद, वर्णभेद किंवा धर्मभेदामुळे बाधित होऊ शकत नाही. सर्व मनुष्य प्राणी समानाधिकारी असून, प्रत्येक साधनावर व संधीवर प्रत्येकाचा सारखाच अधिकार असतो,' हे मानवाधिकाराचे मूलभूत तत्त्व या मान्यवरांना पुरेपूर उमगले होते. त्यामुळे त्यांना ही वैचारिक उंची गाठता आली. ब्राम्हणीझमच्या विषारी वास्तवाचा बोध ते घेऊ शकले. जातींच्या स्वार्थ परायणतेच्या कोषातून बाहेर येऊन सार्वकालिक सत्याला स्वीकारण्याचे धाडस त्यांच्यात होते. उच्चवर्णीय म्हणून समजल्या जाणाऱ्या समाजात जन्म घेणाऱ्या परंतु त्या कृत्रिम उच्चवर्णीयत्वाचा बुरखा फेकून देणाऱ्या धाडसी क्रांतीकारकांचा 'समता' हा प्रलेख होय.

प्रबुद्ध भारताने 1966 साली 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर अमृत महोत्सव विशेषांक' प्रसिद्ध केला होता. या अंकात समाज समता संघाचे एक संस्थापक सदस्य भा. वि. प्रधान यांचा लेख पुढीलप्रमाणे आढळतो. या लेखात त्यांनी समाज समता संघाच्या स्थापनेविषयी महत्त्वाची माहिती नमूद केली होती. ते लिहितात; सन 1927 सालांची अत्यंत महत्त्वाची घटना म्हणजे 'समाज समता संघा'ची स्थापना ही होय. वर नमूद केलेले ब्राम्हण-ब्राम्हणेतर वर्तमानपत्र चालविणारे देवराव नाईक व त्यात लेख लिहिणारे यांचा व डॉक्टरसाहेबांचा परिचय या वर्षी झाला. तो महाडच्या परिषदेमुळे जास्त दृढ झाला. श्री. देवराव नाईक, प्रस्तुत लेखकाचे बंधू श्री. डी. व्ही. उर्फ भाई प्रधान, भा. र. कद्रेकर वगैरे मंडळी साहेबांकडे नेहमी जमू लागली व त्यांची डॉ. साहेबांशी बऱ्याच वेळी तासन् तास चर्चा होत असे. डॉ. साहेबांचे अस्पृश्यतेसंबंधी व जातिसंस्थेविषयीचे विचार व या मंडळीचे विचार सारख्याच प्रकारचे असल्यामुळे डॉक्टरसाहेबांभोवती स्पृश्य कार्यकर्त्यांचा एक गोतावळा निर्माण झाला. डॉ. साहेबांच्या सामाजिक चळवळीबद्दल वेळोवेळी नानाप्रकारच्या टीका होत व त्यांचे विषयी अत्यंत गैरसमज निर्माण करण्यात येत असत. ब्राम्हणशाही उर्फ ब्राम्हण्य हे घालवावयाचे असेल तर जाती संस्थेचे निर्मूलन झाले पाहिजे. त्यामुळेच सामाजिक समता स्थापन होईल अशी डॉक्टर साहेब व त्यांचे स्पृश्य कार्यकर्ते यांची खात्री झाली. पंजाबात भाई परमानंद हे सामाजिक समतेची चळवळ 'जातपात तोडक' संस्था चालवून करीत होते, त्या धर्तीचे व त्याहून व्यापक असे कार्य मुंबई प्रांतात आपले हातून व्हावे अशी डॉ. साहेबांची व त्यांच्या सहकाऱ्यांची इच्छा होती. श्री. देवराव नाईक, भाई प्रधान, डॉ. प्रधान, बी. कद्रेकर, बाबूजी कवळी, एस. एस. गुप्ते, बापुसाहेब सहस्त्रबुद्धे वगैरे मंडळी त्या दृष्टीने विचार-विनिमय करू लागले व त्याची परिणीती 'समाज समता संघ' स्थापण्यात झाली. या संघातर्फे रोटीबंदी व बेटीबंदी तोडण्याचे कार्य करण्याचे ठरले. संघाचे अध्यक्ष म्हणून डॉ. साहेबांची नियुक्ती केली व प्रस्तुत लेखक व एस. एस. गुप्ते चिटणीस म्हणून झाले. माझे नावाने 'ब्राम्हण-ब्राम्हणेतर' या पत्रांत या समाजाचे उद्देश जाहीर करण्यात आले. ते पत्र ता. 16/9/1927 च्या अंकात प्रसिद्ध झाले ते असे :-



विलास गजभिये
मो. 9421588901

... हिंदु महासभा, आर्यसमाज, प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज इत्यादी अनेक संस्था मुंबईला व मुंबईबाहेर महाराष्ट्रात आज हयात असता, त्यांच्याचपैकी एखाद्याची एखादी शाखा दादरला न उघडता नवे नाव धुंडण्यापासूनची ही यातायात आपण कशाला करीत बसलो आहो, हाही विचार या मंडळाच्या मनात आल्याशिवाय राहिला नाही. पण या सर्व गोष्टी तिकडे पंजाबातही होत्या व आहेत. पंजाब तर आर्य समाजाचा बालेकिल्ला समजला जातो आणि भाई परमानंदजी तर हिंदुमहासभेचे एक मुख्य आधारस्तंभ-दुसरे सावरकरच गणले जात होते. पण ज्या कारणांमुळे स्वामी श्रद्धानंदजींना हिंदु महासभेचा राजीनामा द्यावा लागला आणि भाई परमानंदजींना तिच्यापासून फुटावे लागले, त्याच कारणांमुळे हिंदुमहासभेशी नाते जोडण्याचा विचार आमच्या मंडळींना पसंत पडला नाही. नुसती लोकमान्यताच मिळवावयाची असती तर व सभासदांची संख्या फुगवावयाची असती तर हिंदु महासभेच्या नावाचा उपयोग आम्हाला सहज करता आला असता...'




भा. वि. प्रधान यांच्या दि. 16/9/1927 च्या लेखात समाज समता संघाच्या ध्येय्य धोरणांबद्दल पुढील उल्लेख होता. संघाचे तत्त्व सूर्याप्रमाणे स्पष्ट व वज्राप्रमाणे अभेद्य आहे. ते मुसलमानाला भीत नाही, ब्राम्हणाला घाबरत नाही. अगर सत्यशोधकाला पाहून बिचकत नाही. समता (समाज, जाती, पंथ व धर्म समता) हा या संघाचा पाया आहे व निर्भयता हे कवच आहे. हे कवच धारण करण्याची ज्याच्यात कुवत असेल तो या संघात सामील होईल. ज्याचा 'धर्म' काचेच्या बांगडीप्रमाणे पिचका अगर मातीच्या ढेकळाप्रमाणे ठिसूळ नसेल त्यालाच यात येण्याचे धैर्य होईल. ज्याच्या गळ्याला जाती व धर्मदर्शक उच्चनीचत्वाचा फास लागलेला नसेल व त्यामुळे ज्याचा अंतरात्मा आकुंचित व संकुचित होऊन पडला नसेल असा प्रत्येक खरा 'मनुष्य' या संघाचा सभासद होऊ शकेल. त्याच्या ठायी जर वर्ण-अहंकाराचा रोग नसेल तर आमच्या मुंबईच्या गव्हर्नर साहेबांच्या चिरंजीवाला सुद्धा या संघाचा सभासद होता येईल. हसन निझामीचा मुलगासुद्धा, इस्लाम धर्मानुयायांतील या पाक-नापाक धर्मभेदसूचक रोगापासून मुक्त असल्यास, संघाचा अगर ब्राम्हणीझमवाल्या मातंग बंधू सकटांचा कोणाचाच आम्हाला विटाळ वाटत नाही अगर यांचे कोणाचे भयही वाटत नाही...'

हिंदु महासभेशी नाते जोडण्याऐवजी समाज समता संघाची स्थापना करणे डॉ. बाबासाहेबांनी पसंत केले. हिंदु महासभेचा डॉ. बाबासाहेबांना तिटकारा का वाटत होता? याचे कारण बहिष्कृत भारतातील दि. 3/6/1927 च्या 'अस्पृश्यता निवारणाचा पोरखेळ' या शिर्षकाने प्रसिद्ध झालेल्या लेखाच्या उत्तरार्धात सापडते. या लेखात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदु महासभेच्या स्थापनेची विस्तृती माहिती दिली. ते लिहितात, '1909 साली मुसलमानांनी काँग्रेसमधून फुटून जाऊन मुस्लिम लिग काढली. तेव्हाच त्याला प्रत्युत्तर म्हणून त्याच वर्षी 'पंजाब हिंदु सभा' स्थापन करण्यात आली. 1913 साली तिचे संमेलन अंबाला येथे झाले. 1915 साली पंजाब हिंदू सभेचे नामांतर 'सर्वदेशिक हिंदुसभा' असे करण्यात आले. 1923 साली सर्वदेशक हिंदूसभेचे नामंतर 'हिंदु महासभा' असे करण्यात आले. परंतु नामांतर होऊन देखील हिंदु महासभेने निष्क्रिय राहिल्याने शेवटी कंटाळून स्वामी श्रद्धानंद तिथून बाहेर पडले. आता ही हिंदु महासभा पं. मदन मोहन मालवीयासारख्या ब्राम्हण्यग्रस्त भट-ब्राम्हणांची संस्था झाली आहे. या सभेच्या थातूर-मातूर प्रयत्नांनी अस्पृश्यतेचे निवारण होणार नाही. सर्व सार्वजनिक व्यवस्था, रस्ते, ट्रामगाड्या, आगगाड्या, पाणवठे या सर्वांकरिता खुल्या करणे हाच अस्पृश्यता निवारणाचा योग्य मार्ग आहे. याशिवाय दुसरे मार्ग झूठ आहेत, नुसता पोरखेळ आहे.' असे समता वृत्तपत्रात प्रसिद्ध झाले आहे. समता वृत्तपत्र संपादक प्रदीप गायकवाड यांनी प्रकाशित करून अमूल्य कार्य केले आहे. ■ ■

# 'कॅक्टससल' वास्तवभान देणारी कविता




कवी सुरेश रामटेके यांचा कवितासंग्रह 'कॅक्टससल' अलिकडेच प्रकाशित झाला. कॅक्टससल मनू मानसिकता नाकारून समता, न्याय आणि बंधुभावाची संस्कृती मान्य करतो. कॅक्टस म्हणजे निवडुंग. निवडुंग कोणी दारात लावत नाही. बगीच्यात असतात कधी कधी. कॅक्टस हे काटेरी झाड. सर्वत्र काटे आणि त्यात उमलले फुल. सुंदर. देखणे. मनमोहीत करणारे. 'कॅक्टससल' हे पुस्तकाचे नाव दलितांच्या दुःखाचे सटीक निर्देशन करणारे आहे. आमचे जीवन काटेरी. दुःखाचे आहे. आनंदाची फुले यायला सारे आयुष्य संघर्ष करावा लागतो. कॅक्टसची फुले गुलाबालाही लाजवितात. मनाला मोहरवितात. चाफा, चमेली, मोगरापेक्षा कॅक्टस मनमोहक. वेदना आणि विद्रोह हे सुरेश रामटेके यांच्या कवितेचे वैशिष्ट्ये आहे. आंबेडकरवादाला अभिप्रेत क्रांती विज्ञान कॅक्टससल मध्ये आहे.

शब्दांच्याच ढाली आणि शब्दांच्या तलवारी कठोर शब्दांनी दुखावलेली माणसे, गाव, शाळा, कार्यालयांना कवीने पाहिले. प्रसंगी संयमाने उभ्या ठाकलेल्या समस्यांना उत्तर देऊन सकारात्मक बदल घडवून आणला. पण, कवी सभोवतालची स्थिती बघून अंतर्मुख होऊन विचार करीत होता. त्याच शब्दांचे वादळ झाले. हे वादळ अंतर्मुख करणारे होते. हे वादळ शिक्षणाची संधी मिळाल्याने निर्माण झाले हे सहज जाणवते. डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या संदेशातून अधिकार, हक्क याची जाणीव झालेली पिढी निर्माण झाली त्या लिहित्या पिढीचा संदेश 'माणूस म्हणून जगू द्या' कॅक्टससल मध्ये अधोरेखित होतो. दगडही जेव्हा बोलतात तेव्हा इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र समजावून सांगतात. समाजशास्त्र, अर्थशास्त्राची दीक्षा देतात. माणसे मुकी जेव्हा होतात तेव्हा प्रश्न जटिल होतात. सुरेश रामटेके यांचे अनुभव फार खोल आहेत. 'दगड' ही कविता आठवणींचे निळेस्वप्न सांगून जाते. मोजक्या शब्दात समाजाची स्थिती समोर येते. 'झोपडपट्टी, ही कविता अशीच. यातील संदर्भ भारतभर सारखेच. बुलडोझर येतो घर पाडतो. बुलडोझर येतो क्रिकेटचे मैदान नष्ट करतो. बुलडोजर येतो, झोपडपट्टी नष्ट करतो. कायदा कुठे आहे? शासन कुठे आहे? आदेश कुठे आहे? आम्ही सतत बेदखल माणसे. आम्ही राहावे कुठे? आम्ही शिकावे कुठे? आम्ही खेळावे कुठे? आम्हाला या देशात दुय्यम दर्जाची वागणूक दिली जाते. आम्ही भारतीय नाही काय? समतेचा गर्भ कधी वाढलाच नाही. न्यायाचा अर्थ विश्वकोशात सापडलाच नाही. 'विध्वंस' कवितेत कवी गावाच्या शोधात आहे. सूर्य अस्ताला गेला. काळोख झाला. गाव दिसेनासा झाला. विध्वंस असा झाला. गाव दिसेनासे झाले. इरई चंद्रपूरची नदी. खूप सुंदर. लहान आहे. इरई धरण त्यावर बांधले आहे. ताडोबा अभयारण्याच्या शेजारी आहे. ही कविता तेवढीच सौंदर्याने सजलेली. पण आता ती रक्ताने भिजलेली आहे. कवी सुरेश रामटेके म्हणतात- 'ज्यांना तू आपले म्हणून जवळ केलेस त्यांनीच तुला सहन न होईस्तवर ओझे टाकले तुझ्या पोटात खंजर खुपसून तुला रक्तबंबाळ केले..'

इरई नदीत माणसाने केलेले आक्रमण त्याच्यावरच उलटले. पूर आला. सुर बिघडला. अर्धे चंद्रपूर पाण्यात बुडाले. पुराने उध्वस्त झाले. घरे पडली. गावात राहणारे गावकुसासा बाहेर जागा शोधू लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लढ्याचा अर्थ आणि अन्वयार्थ येथे पाहावयास मिळतो. फुले, शाहू, मार्क्स, आंबेडकर, कन्नू संथाल पर्यंत सारेच संदर्भ त्यांच्या कवितेत मिळतात. कवितांच्या ओळीओळीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर भेटतात. सुरेश रामटेके यांचे कविता समाजातील उणीवा टिपून अहिंसक मार्गाने बदलाची आशा निर्माण करणारी आहे. 'ही कोणती लढाई' या कवितेत कवी सुरेश रामटेके लिहितात :-

'उभे ठाकेल गोधडीत शांत झोपलेला कोरकू,
माडिया, भिल्ल, गोंड सारे... सारे ...
पेटून उठेल दंडकारण्य
वाजू लागतील नगारे
विसरतील रेलातील
उधळणार रंग
गोटूलातूनही पेटेल वणवा तेव्हा थांबव हे सार
ही असेल पहाट एका नव्या क्रांतीची
तुझ्यासाठीही अन् माझ्यासाठीही ....

अजय रामटेके
मो. 9404127699

समस्यांचे माहेरघर आदिवासींचे घर. आदिवासींचे जगणे भयानक आहे. पुरेसे अन्न नाही, वस्त्र नाही, शिक्षण नाही, दवाखान्याची सोय नाही. हे जगणे म्हणजे मरणे आहे. विकासचक्र अर्धेच फिरले. झोपडीत झोपलेला आदिवासी जागा होईल तेव्हाच संपूर्ण क्रांती होईल. म्हणून आपण भिमाच्या दिशेने निघायलाच हवे. हे कवीचे आवाहन समर्पक आहे.

# 'कांची' - विचारसन्मुख करणारी जीवनवादी कादंबरी

मानवी जीवनाचा विशाल पट मांडण्यासाठी 'कादंबरी' हा सक्षम वाङ्मय प्रकार आहे. जीवनातील गुंतागुंत विविध अंगाने प्रतीत करण्याचे प्रचंड सामर्थ्य या वाङमय प्रकारात आहे. या पार्श्वभूमीवर 'कांची' ही विद्या भोरजारे यांची नुकतीच प्रकाशित झालेली कादंबरी लक्षणीय आहे. विषम समाज व्यवस्थेत स्त्रियांची होणारी घुसमट हा नवीन विषय नाही. मात्र त्यातही दलित स्त्रियांच्या वाट्याला आलेले दुहेरी शोषण हे निश्चितच अंतर्मुख करणारे आहे. प्रस्तुत कादंबरीत लेखिकेने 'कांची'चे अफलातून संघर्षमय व्यक्तिमत्व साकारले आहे. अद्यापही स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झालेला नसल्याच्या कालखंडात 'कांची'चा संघर्ष विषम समाजव्यवस्थेच्या डोळ्यात अंजन घालणारा आहे. विद्या भोरजारे आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्या आहेत. त्यामुळे स्वाभाविकपणे त्यांची विचारदृष्टी पुरोगामी आहे. खरेतर आंबेडकरी चळवळीतील 'कार्यकर्ता' हा एकाच वेळी लेखक आणि कार्यकर्ता असतो. अर्थात तो कृतिशील असतो. सामाजिक प्रबोधन करताना त्याला वाचन करणे गरजेचे असते. त्यातून तो आपले चिंतन व लेखनशैली विकसित करीत जातो. प्रस्तुत कादंबरीच्या लेखनातून लेखिकेची उत्तम लेखनशैली प्रत्ययास येते. मानवी 'सुख-दुःख' हा जीवनाचा भाग आहे. दुःख निरोधाचा मार्ग तथागत गौतम बुद्धांनी अडीच हजार वर्षांपूर्वी सांगितलेला आहे. स्व-अनुभूती ही कळत न् कळत भावनात्मकतेला प्राधान्य देत असते. खरेतर आंबेडकरी साहित्य हे समष्टीचे दुःख उजागर करणारे साहित्य आहे. यात 'स्वांतः सुखाय' असे काहीच नाही. तसेही शोषित, पीडितांच्या जीवनात सुखाचे प्रसंग नव्हतेच. मात्र डॉ. बाबासाहेबांच्या बुद्ध धम्म स्वीकारानंतर जी सकारात्मकता निर्माण झाली आहे, हे वास्तव आहे. ललित साहित्यातील 'अनुभूती' हा समष्टीचाच भाग असल्यामुळे त्यातील दुःख प्रत्येकाला आपलेच आहे, असे वाटते. कलात्मकतेच्या अंगाने लेखिकेने समाजवास्तव अधोरेखित केले आहे. आंबेडकरी चळवळीने नेहमीच 'शून्यातून विश्व' साकारले आहे. तरीसुद्धा बऱ्याच गोष्टी अजूनही साकारायच्या आहेत. मानवी जीवनात स्थित्यंतर कालमानपरत्वे आलेले आहे. मुळात 'आंबेडकरी विचार' हा संपूर्ण जगाला सकारात्मक ऊर्जा प्रदान करणारा असल्यामुळे स्वतःचे दुःख विसरून समाजासाठी काहीतरी चांगले करण्याची ओढ निश्चितपणे कलावंतांमध्ये असते. 'डॉ. बाबासाहेबांचे आयुष्य' हेच मुख्य सर्वांच्या दृष्टीने प्रेरक आहे. त्यामुळे अनेक अडचणीतून मार्ग काढत इतरांना आधार देण्याचे कार्य या विचाराने केले आहे. प्रचंड यातना सहन करूनही नायिकेतील 'सकारात्मक बदल' हे या कादंबरीचे वैशिष्ट्य आहे. प्रस्तुत कादंबरीतील 'कांचनकांती' हे नायिकेचे जुने नाव मागे पडून 'कांची' हे नाव रूढ होते. मात्र आनंदी जीवनाची कास धरणाऱ्या 'कांची'चे स्वप्नभंग होते. बेचिराख झालेले तिचे आयुष्य बघून मानवी मन अस्वस्थ होते. पुरुषसत्ताक मानसिकतेमुळे अर्थातच विषमतामय मनोवृत्तीमुळे 'कांची'ला आत्महत्येसाठी भाग पाडणे, हे विदारक सत्य आहे. पुरुषी अहंकारग्रस्त नवऱ्याची साथ सुटल्यानंतर ही नायिका स्वतःच्या आयुष्याला वेगळे वळण देऊ शकते. स्वतःचे कर्तृत्व सिद्ध करणे, ही चांगली बाब आहे. मात्र पती-पत्नीचे विलग होणे, विवाह संस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारे आहे. त्यामुळे प्रत्येकाने स्वतःत सुधारणा करणे आवश्यक आहे. लेखिकेच्या मते, 'स्त्री अन्याय व जातीयतेचे जळमट ही न संपणारी प्रक्रिया' वाटत असली तरी पुरुषांनीही कालमानपरत्वे बदलणे गरजेचे आहे. सुधारित मनच तडजोड स्वीकारू शकेल. मात्र सदर कादंबरीतून वास्तव अधोरेखित केले आहे. तथागत गौतम बुद्धांचा विचार दोन्ही घटकांनी 'मध्यम मार्ग' स्वीकारणे गरजेचे आहे. सुधारणावादी विचार आणि पुरोगमित्व स्वीकारलेल्या लोकांकडून चुकीचे पाऊल अपेक्षित नाही. प्रस्तुत लेखिकेची पहिलीच कादंबरी असावी, असे वाटत नाही. 'विलक्षण, उत्तम भाषाशैली' हे ही कादंबरी लेखिकेचे वैशिष्ट्य असून वाचकांना खिळवून ठेवण्यात लेखिका यशस्वी ठरली आहे. त्यामुळे नवोदितपणाच्या खुणा संपूर्ण कादंबरीत आढळून येत नाही. प्रस्तुत कादंबरीला लोकशाहीर संभाजी भगत यांची विवेचक प्रस्तावना लाभली असून समस्त मानवी जीवनाला दिशादर्शक आहे. सदर कादंबरीच्या निमित्ताने आंबेडकरी साहित्यातील 'कादंबरी' या साहित्य प्रकारातील अनुशेष लेखिकेने भरून काढला आहे. मात्र 'स्त्री मनाची कुचंबणा' थांबविण्यासाठी व्यापक समाज प्रबोधन होणे गरजेचे आहे. अर्थातच मध्यम मार्ग स्वीकारत मानवी जीवनातील तडजोड सर्वांनी स्वीकारणे अपरिहार्य आहे. संसार रथातील केवळ कोणत्याही एका घटकाचेच नव्हे तर उभयतांनी परस्परांना समजून घेणे गरजेचे आहे. ही भूमिकाच आंबेडकरवादाला पूरक ठरणारी आहे.




समीक्षा



दिनेश कोटांगले
मो.9834492541

कांची (कादंबरी)
लेखिका - विद्या भोरजारे,
मो.9975109438
प्रकाशक - संकेत प्रकाशन नागपूर,
मो.9975018995
पृष्ठ - 328, किंमत - 350/- ■ ■

# नवऱ्याच्या मरणाची सजा




घरात, दारात आणि अंगणाबाहेर मुंगीला शिरायला जागा नव्हती एवढी गर्दी जमली होती. कुणी कुणाशी फारसा बोलत नव्हता. हे असे घडायला नको होते, पोरीचे आता कसे होणार? सगळे विचित्र घडले हो, असे कुणाच्या नशिबी येऊ नये. जो तो दबक्या आवाजात बोलत होता. यात दोष कुणाचा होता? जो गेला तो संपला होता. मात्र जातांना तो पत्नी, दोन मुले, आईवडील यांना निराधार करून गेला होता. ऐन पंचविशीतली पत्नी आणि अनुक्रमे पाच, तीन वयोगटातल्या मुली नि छोटा मुलगा. त्यातच सत्तरी पार केलेले आईवडील. सगळे निपचित पडलेल्या देहाकडे पाहून ओक्साबोक्सी रडत होते. मध्येच कुणीतरी त्यांची समजूत काढत होता. अरे या छोट्या लेकरांकडे बघा, त्यांना तर काहींच कळत नाही. आपला बाप झोपला आहे आणि अवतीभवती ही माणसांची गर्दी का जमली आहे? अशा प्रश्नार्थक नजरेने ते निष्पाप जीव सर्वांच्या चेहऱ्याकडे पाहत होते. मध्येच ती रडणाऱ्या आईच्या कुशीत शिरत होते. हे दृश्य फार वेदनादायी होते. आता घडले ते घडले, आल्या प्रसंगाला सामोरे गेले पाहिजे. पुढील विधी पार पाडले पाहिजेत. यासाठी वाडीतील म्होरक्यांनी एकमत करून ते पुढील तयारीला लागले. श्वास असेपर्यंत देहाला किंमत असते. नाहीतर हा देह नाशवंत आहे. देह चालतो, बोलतो तोपर्यंत, तो, ती असतो, तो निपचित पडला की त्याची बॉडी, मढे होते. हे मढे जादा वेळ ठेवून इतरांचा वेळ घेण्यात अर्थ नव्हता. म्हणून अंत्यसंस्काराची तयारी सुरू केली. नात्यागोत्यात सर्वांना कळवले गेले. शहरात दूर असणाऱ्यांना फोन, मेसेज करून कळवले गेले. आजारी व्यक्तीला औषधासाठी चार पैसे मदत.... सोडा, पण त्याची कुणी ख्याली-खुशाली विचारली नव्हती. गावात, वाडीत येऊन त्याच्या घरात कोण आला नाही पण तो गेल्याची वार्ता कळताच वाडी, गाव तालुका व्हाटस् ॲप ग्रूपवर श्रद्धांजली, मुला लेकरांचे कसे होणारे, आता आपणच काहीतरी मार्ग काढू, आपले मंडळ, संघटना, समाज यांना आधार देईल अशा कमेंट सुरू झाल्या होत्या. पण आम्ही आल्याशिवाय बॉडी उचलू नका असे धडधड मेसेज पडले, प्रमुखांना फोन येऊ लागले. रात्री जेवणानंतर घडलेली ही दुर्दैवी घटना आता उद्या दुपार, संध्याकाळपर्यंत नातेनाईक, गावावाले शहरवासीय आल्याशिवाय उचलले तर त्यात पुन्हा वादावादी होणार. मुद्दाम केले, आम्हाला अंत्यदर्शन घेऊ दिले नाही असे आरोप-प्रत्यारोप नकोत म्हणून वाट पाहणे पसंत केले. आम्ही एकत्रित बसतोय निघतोय, गाडी बघतोय, आता रात्र आहे, पहाटे निघू असे मेसेज, फोन सुरू झाले. आजुबाजूच्या गावातील नात्यातील मंडळी सकाळपासून येऊ लागली. त्यांना दुपारची वेळ दिली. ज्यांच्या कुटुंबात हा प्रसंग घडला त्यांच्या मनाची, शारीरिक क्षमतेची कुणालाच कदर नव्हती. अशा वेळी ती करण्यात अर्थ नसतो. बारा एक वाजता येणारी मंडळी दुपार टळून सूर्य मावळतील निघाला तरी इथे आहोत, जवळ आलोय करत सूर्यास्त होण्याआधी शहरवासीय आले. पोटात अन्नाचा कण नसल्याने कुटुंबातील, नात्यातील काहीना चक्कर आली. त्यांना प्राथमिक उपचार करून शांत केले जात होते. असे हे सगळे सुरू होते. मध्येच रडण्याचा आवाज, अरे कुठवर चाकरमानी आलेत बघा! अशी चौकशी कुणीतरी वयोवृद्ध करत होते. तासाभराच्या अंतरावर आहेत हे चार तास जो तो ऐकत होता. कुणीतरी चिडला आणि म्हणाला, कशाला त्या चाकरमान्यांना फोन केलात? आता येऊन काय मढे जिते करणार आहेत काय? साले जिवंतपणी कोण गावी आल्यावर हाक मारत नाहीत. पण मेल्यावर मात्र झुंडीने येतात. नुसता साला देखावा! बॉडीचा आणि जीवंत मुला-लेकरांचा, त्यांच्या मनाचा, भुकेचा विचार कोणीच करत नाहीत. एवढ्या दुःखद प्रसंगात एक दारू अती झाल्याने, पण खरे बोलत होता. त्याला एकजण म्हणाला, अरे समोरचा प्रसंग कशामुळे घडला याची जाणीव हाय काय रं? मेल्या तू पण लवकर जायचा ठरवल आहेस का? असे बोलतच, मी काय तुझ्या पदरची प्यायलो नाही. सकाळ पासून खाय खणली जाऊन, दोघेजण तिथे थांबले. मला म्हटले जरा वाडीत जाऊन बॉडी कधी खाली आणतात ते बघून ये म्हणून आलोय इथे. पोटात अन्न नाही पण या पाण्याने ऊर्जा दिलीय. जाणारा जातो पण मागच्यांना किती त्रास होतो त्याचा हे आरामात येणारे विचार करत नाहीत. पिणारा स्वतःशी बडबडत होता. एवढ्यात आले, आले! चाकरमानी आले असे कुणीतरी बोलला. पुन्हा रडण्याचा आवाज, त्यातून एकमेकास सावरून पुढच्या तयारीला लागतात. अंत्यसंस्काराची तयारी सुरू होते. त्यावेळचा प्रसंग हा हृदय पिळवटून टाकणारा होता. एक तरुण स्त्री आक्रोश करत होती. तिच्या भविष्याच्या स्वप्नांची राखरांगोळी झाली होती. नवरा मेला ती विधवा झाली. त्यामुळे नवऱ्याच्या जाण्याने तिच्या अंगावरचा सौभाग्याचा साज उतरविण्यासाठी बायकांच्यात स्पर्धा लागली की काय? असे चित्रं समोर दिसत होते. तिचा आक्रोश कुणालाच दिसत नव्हता. दैवाला नी देवाला दोष देत तिचे अवसान गळले होते. कपाळवरचे कुंकू, हातातला हिरवा चुडा, नि तिचा गळा होणार होता ओकाबोका, कान, नाक, पाय अन बोटे होणारे होती मुक्त रूढीच्या रिवाजानुसार. तिचा नवरा मेला होता नि समाज तिच्यावर असा अंधश्रद्धेने सूड घेत होता, तिला उघडी बोडकी करून. म्हणे ज्याचे होते त्याच्यासोबत जाऊ दे बोलून. हे सगळे भयाण दृश्य मनाला यातना देणारे होते. ती अंगाला स्पर्श करु देत नव्हती तेव्हा त्या प्रसंगातही बाया तिच्यावर खेकसत होत्या. कुणी तिचे मंगळसूत्र ओढत होते तर दुसरीने अडकित्याने, दगडाने बांगड्या फोडून तिचे हात रक्तबंबाळ केलेच तर कुणीतरी नवऱ्याच्या कफनाचे एक टोक हातात धरून तिचे कपाळाचे कुंकू पुसताना तिचा जीव तिळतिळ तुटत होता. ती जीवंत असून प्रेत झाली होती प्रेतासमोर. कारण इथल्या रुढींनी तिची वाचा बंद केली होती. ती नवऱ्याच्या मरणाची सजा भोगत होती. समाज तिच्या अवतीभवती मूकपणे उभा होता. अज्ञान, अंधश्रद्धेने असा पिढ्यान पिढ्या कित्येक जणींच्या भावनांचा बळी घेतला आहे. अशा या प्रथेला स्वतःला सुशिक्षित, सुसंस्कृत समजणारा समाज विरोध न करता, परिवर्तन विचार सांगणाऱ्यांच्या विरोधात आजही एकवटून उभा राहतो. शेकडो वर्षे आधी अशा प्रथेविरुद्ध कार्य करणाऱ्या सुधारकांना किती त्रास झाला असेल? त्यांचा इतिहास सांगताना इतिहासाची पुनरावृत्ती होणार नाही याची खबरदारी घ्यायला हवी. अंगावरचा साज उतरवून नेमके काय साधले जाते? याचे कुणीच स्पष्टीकरण देत नाही. आजवर कुणी दिलेले नाही. स्त्रीमुक्तीच्या, स्वातंत्र्याच्या मनमोकळ्या गप्पा मारणारे नेमके अशा वेळी गप्प बसतात आणि कैक जणी नवऱ्याच्या मरणाची अशी संस्कृतीच्या नावाखाली सजा भोगत असतात. ■ ■



राष्ट्रपाल भा. सावंत
मो. 9403144356



# काव्यफुले

संयोजक : प्रा. भीमराव गायकवाड
मो. 9822507225
बहुजन सौरभ

## कल्याणकारी राजश्री शाहू महाराज

सर्व मानव समान आहे
बहुजनात एकरूपता पाहे
मानवी मूल्य जपण्या
संवेदशील होऊन 'राजश्री छत्रपती'
माणसास करूणे तेने पाही....1...
माणसाला प्रतिष्ठा, सन्मान देई
फासेपारधी, वडारालाही काम देई
शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्या
धरणे बांधुन केल्या पाण्याच्या सोई
असा तू छत्रपती शाहू महाराज होई...2...
स्वत: बहुजन समाजात जाऊन
विविध समाजाचे केले अवलोकन
जाणले शिक्षणाचे मर्म
उघडून शाळा - वस्तीगृहे
नव पिढीचे केले कल्याण...3..
भेदाभेद मिटविण्यास
प्राशन करून 'कांबळेचा' चहा
भेदाभेद करू नका हे सांगे समाजास
'उत्थान' व्हावे सर्वांचे
सर्वतोपरी केली 'मदत' मजुरास.. 4...
बाबासाहेबांना देऊन मदत
सुरू ठेवले 'मूकनायक'
नायक तुमचा मिळाला
'माणगांव' परिषदेत सांगे समाजास
ज्योतिबाचा वारसा पुढे नेण्यास...5...

- इंजि. शुद्धोधन बडवने

## फिके तोहफे

नको तुलना माझी
कुणाशी।
मी आहे तुझा प्रेम दिवाना।।
मी कुठे कसाही असलो
तरी।
तुच असशील माझा
ठिकाणा।।

चित्ती असु द्यावे समाधान।
नाही भेटले चंद्र तारे जरी।।
असेल इथे ध्यास तुझाच।
मी जीवंत असेल तोवरी।।
तुझे मागणे माझे देणे।
व्यवहर हा जगाचा।।
तुझे अश्रू भासे मोती।
झरा हा नीत प्रेमाचा।।

किती भांडायचे भांडून घे।
किती सजायचे सजून घे।।
तोहफे सारे असतील
फिके।
हे निसर्ग सत्य समजून
घे।।

- दिवाकर शिर्के

## प्रेमळ बोलने

मृदु प्रेमळ बोलने,
त्याची गोडी अमृत ।
साऱ्या प्राण्यास सुख देई,
शब्द पडती कानात ... (1)

पोट भरण्या लागे अन्न
गोड शब्दाने मन भरा
साऱ्या प्राण्यांसवे नाते
दया करूनेने जोडा ... (2)

दया करूनेची भाषा,
आहे सर्वांना अवगत।
ऐकण्याची वाट पाहे,
खाणे सोडूनी गवत ... (3)

रोगी बिमार माणुस,
गोड शब्दांनी होई बरा ।
मिळे हिमतीचे बळ,
येई औषधी गुण त्याला ... (4)

विचार करून शब्द बोलावे,
नाही शब्दाला हात-पाय।
एका शब्दाने जुडे मैत्री,
एका शब्दाने जीव जाय ... (5)

करने दूर राहो,
तु बोलने आधी शिक ।
गोड बोलण्या कारणे,
मिळे समाधान आणि सुख
मिळे समाधान आणि सुख ... (6)

- चरनदास घागरगुंडे

## पाऊस : जगण्याची प्रेरणा

पृथ्वीस ओढ पावसाची,
नदीस लागे सागराची।
मातीस ओढ अंकुराची,
तिफणीस आस पेरणीची।।

पावसाने हंगाम व्हावे,
चराचर हिरवे करावे।
जुंपून ऋतू नागराला,
मळे सुखाचे फुलवावे।।

तूच भूक तूच तहान,
सर्व जीवांचे तूच प्राण।
पाखरांच्या चोची भुकेल्या,
पावसा गाती तुझेच गाणे।।

नभाचे भूमीला दान नको,
देणाऱ्याचे फुकटचे हात नको ।
घेणाऱ्याने का घ्यावे देणाऱ्याचे हात
पावसा तूच आहेस या सर्वांवर मात ।।

माणसाने माणसांची जपलेली
माणूस भावना,
माणसांच्या काळजात रुजवून
ये तू पुन्हा पुन्हा।
पावसा तूच रे अमुच्या
जगण्याची प्रेरणा।।

- अनिल मनोहर

## विखुरले जाऊ नका बांधवांनो!

विखुरले जाऊ नका बांधवांनो
हि वेळ गमवायची नाही ।
एका फुलाची फुल माळ
कधीच होत नाही ।
उज्वल इतिहास आहे अमुचा
बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकर यांचा
विसरू नका तयाला, विकास
होणार नाही ।
पद्धतशीर आखणी केली आहे विरोधात
तुमच्या मनूपुत्रांनी
गफलतीत राहू नका
त्वरा करा संघटित होण्याची ।
किती बैठका, किती सेमिनार
किती मोर्चे अंदाज नाही..
निकाल येतो निवडणुकीचा
एकही निवडून येत नाही!
सर्व जास्त बुद्धिवान,
कमी बुद्धिवान डोक्यांचा मेळ घाला
विसरून अपुले हेवेदावे
सहन शीलता ठेऊन एकी बांधा
सोडा आस कर्मट नेत्यांची
नापीक बियाणे मोडीत काढा
सुदृढ बीयाची पेरणी करूनी
फुलवू या मळा एकतेचा ।

- डॉ. एम एस जांभूळे

